## <u>प्रेसनोट</u> दि.१७/०४/२०१९
## दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे

### उबेर चालकास मारहाण करुन लुटणा-या दोघांना दत्तवाडी पोलीसांनी अवघ्या १४ तासात केले जेरबंद

दि. १५/०४/२०१९ रोजी इसम नामे सुरज इरन्ना शहाबडे हे त्यांची उबेर कंपनीला त्यांनी लावलेली मारूती सुझुकी रिटझ कार क्र. एमएच-१२/ एन बी-१९५४ ही घेवुन पॅसेजरची वाट पाहत पंचमी हॉटेल चौक काका हलवाई दुकानासमोर पुणे-सातारा रोड येथे थांबले होत त्यावेळी अचानक रॉग साईडने ग्रे रंगाच्या ॲक्टीवा मोटर सायकलवर दोन इसमांनी येवुन फिर्यादी यांना शिविगाळ करुन खाली उतरण्यास सांगुन ते खाली उतरले असता त्यांचेकडील एक नोकीया कंपनीचा ॲन्ड्रॉईड मोबाईल हॅन्डसेट व रोख रक्कम ८३०/-रु. हिसकावुन घेवुन फिर्यादी यांना ढकलुन देवुन पळुन गेले होते. म्हणुन त्याबाबत फिर्यादी यांनी तक्रार दिल्यावरुन दत्तवाडी पोलीस ठाणे येथे अज्ञात इसमांविरुध्द भा. द. वि. कलम ३९२ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयातील नमुद अनोळखी इसमांचा तपास चालू असताना दत्तवाडी पोलीस ठाणेकडील तपास पथकातील पो. शि. अक्षयकुमार वाबळे व पो. ना. सोमेश्वर यादव यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, “दोन इसम तावरे कॉलनी चौक पुणे येथे त्यांचेकडे असलेला चोरीचा नोकीया कंपनीचा मोबाईल घेवुन तो विकण्यासाठी संशयास्पदरित्या थांबलेले आहेत त्यातील एकाने त्याचे अंगात काळा शर्ट व निळी जीन्स पॅन्ट घातलेली असुन तो रंगाने सावळा व उंच आहे तसेच दुस-याने त्याचे अंगात पांढरे रंगाचा टिशर्ट व फिक्कट निळी जीन्स पॅन्ट घातलेली असुन त्याचे केस कुरळे आहेत व तो उंच आहे. तरी त्यांचेकडे असणारा नोकीया कंपनीचा मोबाईल हा चोरीचाच असावा.” अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने ती बातमी त्यांनी तपासपथकाचे प्रभारी पोलीस उपनिरिक्षक श्री कुलदीप संकपाळ यांना कळविली असता त्यांनी खात्री करुन सदरबाबत वरिष्ठ पोलीस निरिक्षक देविदास घेवारे यांना कळविले असता त्यांचे तोंडी आदेशप्रमाणे पोलीस उपनिरिक्षक संकपाळ यांनी स्टाफसह तत्काळ तावरे कॉलनी चौक पुणे येथे जावुन थोडे आडबाजुस थांबुन खात्री केली असता बातमीतील वर्णनाचे इसम तेथे पानटपरी जवळ थांबलेले असल्याचे दिसल्याने त्यांना सोबतचे स्टाफचे मदतीने अत्यंत शिताफीने पकडुन त्यांना त्यांची नावे पत्ता विचारता त्यांनी आपली नावे १) गणेश बजरंग जाधव वय. २६ वर्षे रा. ३ रा मजला इद्रांयणी अपार्टमेंट धनकवडी पुणे २) विशाल भिमराव ओव्हाळ वय. २४ वर्षे रा. पद्मावती वसाहत पदमावतीदेवी मंदीरासमोर पुणे त्यावेळी त्यांची अंगझडती घेतली असता अ.नं. १ याचे पॅन्टचे डावे खिशात एक नोकीया कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट मिळुन आला त्या हॅन्डसेटबाबत दोघांकडेही तपास केला असता त्यांनी नमुद हॅन्डसेट हा त्यांनी दि. १५/०४/२०१९ रोजी पहाटे ०४/३० वा. चे सुमारास पंचमी हॉटेलजवळ पुणे सातारा रोड येथे एका उबेर चालकाला लुटुन त्याचेकडुन घेतलेला असल्याचे सांगीतले तसेच सदर उबेर चालकाकडुन रोख रक्कम ८३०/- रुपयेही काढुन घेतले होते असे सांगीतले त्यावेळी पोलीसांनी खात्री केली असता सदरचा मोबाईल हा पंचमी हॉटेलजवळ लुटल्या गेलेल्या इसम नामे सुरज इरन्ना शहाबडे यांचाच असल्याची खात्री झाल्याने नमुद दोन्ही इसमांना त्याबाबत दाखल असलेल्या गुन्हयात अटक करुन त्यांची आजरोजी १ दिवसाची पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली व परत त्यांचेकडे तपास केला असता उर्वरीत रोख रक्कम व गुन्हा करण्यासाठी वापरलेली ॲक्टीवा गाडी हे ही पोलीसांनी दाखल गुन्हयाचेकामी जप्त केले असुन दाखल गुन्हयाचा अवघ्या १४ तासातच छडा लावला आहे. तसेच वरील दोन्हीही आरोपी हे सहकारनगर पोलीस ठाणेचे रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत.

सदरची कामगिरी ही मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री देविदास घेवारे सो व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री राजेंद्र सहाणे सो यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उप-निरीक्षक श्री कुलदिप संकपाळ, पोलीस कर्मचारी पो.हवा. रविंद्र फुलपगारे, पो.ना. सुधीर घोटकुले, पो.ना. महेश गाढवे, पो. ना. सोमेश्वर यादव, पो. ना. कुनाल माने, पो. शि. अक्षयकुमार वाबळे, पो.शि. विकास कदम, पो. शि. सागर सुतकर, पो.शि. शरद राऊत, पो.शि. शिवाजी क्षीरसागर पो शि राहुल ओलेकर, पो शि अमित सुर्वे व पो शि अमोल लोहार यांनी केली असुन नमुद गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ हे स्वतः करीत आहेत.

(देविदास घेवारे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पोलीस ठाणे पुणे शहर